*(A High Impact Factor, Quarterly, Peer Reviewed, Referred & Indexed Journal)*

*NAVJYOT / Vol. XIV / Issue – I* *ISSN 2277-8063*

# महिलांचे आर्थिक स्वातंत्र्य,कुटुंब संवर्धनातील भूमिका आणि अडचणी व उपाययोजना

**प्रा. नम्रता आनंदराव निकम** सहाय्यक प्राध्यापक,अर्थशास्त्र विभाग, कमला कॉलेज
(स्वायत्त),कोल्हापूर namratanikam55@gmail.com

---

**गोषवारा** :-

आर्थिक स्वातंत्र्य हे महिलांच्या बाबतीत सर्वात महत्वाचा अंग बनते. विशेषतः भारतीय महिलांच्या बाबतीत आर्थिक दृष्ट्या स्वातंत्र्य मिळणे हे त्यांना आत्मविश्वासी व निर्णय घेण्यास सक्षम बनवते. भारतीय समाजामध्ये पुरुष हा उत्पन्न मिळवणारा तर स्त्रिया या घर व मुलांचे संगोपन करणे यापर्यंतच मर्यादित राहिल्या आहेत. या शोधनिबंधाच्या आधारे महिलांच्या आर्थिक स्वातंत्र्यामुळे त्यांच्या कुटूंब संवर्धन भूमिकेत होणारे बदल, आर्थिक स्वातंतत्र्य मिळवण्यास येणाऱ्या अडचणी व त्यावरील उपाययोजना यावर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केला आहे. महिलांच्या आर्थिक स्वातंत्र्य आणि कुटुंबातील त्याच्या भूमिकेच्या संबंधांचा अभ्यास करतो.

आर्थिक स्वातंत्र्यामुळे आर्थिक तसेच कुटुंबाच्या महत्त्वाच्या गोष्टींमध्ये निर्णय घेण्याची क्षमता, कुटुंबावरती होणारा सकारात्मक परिणाम, समाजामध्ये यामुळे होणारे बदल, आर्थिक स्वातंत्र्य मिळवताना महिलांसमोर येणारे अडथळे व त्यावरील उपाययोजना यांचा अभ्यास केला आहे.संशोधनातील निष्कर्ष महिलांचे आर्थिक स्वातंत्र्य त्यांच्या निर्णय क्षमतेला वाढवतो, कुटुंबातील त्यांचे स्थान सुधारते आणि लिंग आधारित समानता प्रस्थापित करण्यासाठी प्रोत्साहन देते. महिलांच्या आर्थिक स्वातंत्र्यामुळे त्यांच्या अधिकारांसाठी त्या अधिक जागरूक होतात. या अभ्यासाचा निष्कर्ष असा सूचित करतो की, महिलांसाठी आर्थिक स्वातंत्र्य मिळवणे हे केवळ त्यांच्या व्यक्तिगत विकासासाठी महत्त्वाचे नाही तर कुटुंबाच्या सर्वांगीण विकासासाठी व समाजातील लिंग आधारित भेदभाव कमी करण्याच्या दृष्टीने गरजेचे आहे.

**सूचीशब्द** : आर्थिक स्वातंत्र्य , कुटुंब संवर्धन, निर्णय क्षमता

## प्रस्तावना

महिलांचे आर्थिक स्वातंत्र्य आणि कुटुंब संवर्धन यामध्ये अत्यंत घनिष्ट संबंध आहे. पारंपारिक समाजरचना यामुळे महिलांना समाजात दुय्यम स्थान मिळाले आहे. त्यामुळे त्या कुटुंबाच्या आर्थिक तसेच इतर व्यवहारामध्ये बाजूला पडलेल्या दिसतात. पण काळाबरोबर त्यांनी विविध क्षेत्रात आपले स्थान निर्माण करून आर्थिकरित्या सक्षम होत आहेत. ज्यावेळी महिला या आर्थिकदृष्ट्या सक्षम बनतात त्यावेळी फक्त त्यांचे स्वतः चे आयुष्य सुधारत नाही, तर त्यांच्याबरोबर संपूर्ण कुटुंब व समाज प्रगतीकडे जातो. महिला या कुटुंबातील व समाजातील महत्त्वाच्या भाग आहेत. त्यांच्याकडे आपण शक्ती म्हणून पाहतो. आर्थिक स्वातंत्र्यामुळे त्या अधिक स्वतंत्र होतात व यामधून त्यांना सामर्थ्य मिळते. या संशोधनामध्ये महिलांच्या आर्थिक स्वातंत्र्यामुळे कुटुंबावरील व मुलांच्या संगोपनावरील सकारात्मक परिणाम तपासले जातील. तसेच आर्थिक आर्थिक स्वातंत्र्य मिळवताना येणाऱ्या अडचणी व त्यावरील उपाययोजना हे तपासले जाणार आहे.

## संशोधन साहित्याचा आढावा

कुशवाह, ए., (२०१५), “Women’s Economic Independence and Change in Family Power Structure” या शोधनिबंधामध्ये महिलांचे आर्थिक स्वातंत्र्य आणि कुटुंबातील बदलती भूमिका, त्यांची निर्णय क्षमता यावरती भाष्य केले आहे. आर्थिकदृष्ट्या सक्षम असणाऱ्या महिला निर्णय घेण्याच्या प्रक्रियेत कशी महत्वाची भूमिका पार पाडतात व त्यामुळे त्यांच्या कुटुंबाच्या स्तरामध्ये कसा बदल होतो हे अभ्यासले आहे. सुंदरी, आर., (२०२३), Changing Dynamics of Women Role in Family Structure या शोधनिबंधामध्ये महिलांच्या आर्थिक स्वातंत्र्यामुळे निर्णय घेण्याविषयी त्यांचे विचार, त्यामुळे त्यांच्या कुटुंब व समाजातील स्थानातील बदल व यामुळे महिलांच्या करिअर, शिक्षण याकडे पाहण्याचा सकारात्मक दृष्टीकोन यावर चर्चा केली आहे.

पांडे, एस., (२०२४), “A Critical Examination of Women’s Economic Independence” या शोधनिबंधामध्ये महिलांच्या आर्थिक स्वातंत्र्य मिळवण्याच्या प्रक्रियेत येणारे अडथळे जसे लिंगाधारित उत्पन्न असमानता, महिलांसमोरील सामाजिक अडथळे याविषयी चर्चा केली आहे, तसेच त्यावरील उपाययोजना यावर चर्चा केली आहे.

## संशोधनाची उद्दिष्ट्ये

1. महिलांचे आर्थिक स्वातंत्र्य आणि कुटुंब संवर्धन यातील परस्पर संबंध अभ्यासणे.
2. महिलांच्या आर्थिक स्वातंत्र्यासामोरील अडचणी आणि त्यावरील उपाय शोधणे.

## संशोधन पद्धती

महिलांच्या आर्थिक स्वातंत्र्याचा कुटुंबातील भूमिका आणि प्रभाव यावर आधारित या संशोधनात द्वितीयक सामग्री आणि गुणात्मक पद्धती यांचा वापर करण्यात येईल. या पद्धतीचा उद्देश महिलांच्या आर्थिक सशक्तीकरणाचे विविध दृष्टिकोनातून विश्लेषण करणे आणि कुटुंबातील त्यांच्या भूमिकांवरील प्रभाव समजून घेणे आहे. तसेच अडथळे आणि त्यावरील उपाययोजना यांचा अभ्यास करणे हा आहे. द्वितीयक सामग्री संकलनामध्ये आधीच उपलब्ध असलेल्या माहितीचा वापर केला आहे.

महिलांच्या आर्थिक स्थितीशी संबंधित सरकारी अहवाल, राष्ट्रीय सांख्यिकी, महिला सशक्तीकरण प्रकल्प, कुटुंबातील भूमिका याबद्दलचे आधिकारिक अहवाल वापरण्यात येतील. यामध्ये महिलांच्या कामकाजी परिस्थिती, लिंग समानतेचे संकेत, आणि कुटुंबीय निर्णय प्रक्रियेत महिलांचा सहभाग यावर दिलेल्या माहितीसाठी संदर्भ घेतला जाईल.आर्थिक स्वातंत्र्य मिळवण्यासाठी महिलांना समोरे जावे लागणाऱ्या अडथळे आणि त्यावरील उपाययोजना यावर प्रकाश टाकण्यास मदत होईल. महिलांच्या आर्थिक स्वातंत्र्य आणि कुटुंबातील त्यांच्या भूमिकांवर आधारित विविध संशोधन, शोधनिबंध आणि साहित्याचा अभ्यास केला जाईल. या साहित्याच्या आधारावर, महिलांच्या आर्थिक सशक्तीकरणाच्या विविध पैलूंवर प्रकाश टाकणारे निष्कर्ष प्राप्त करण्यात मदत होईल.

**आर्थिक स्वातंत्र्य**

महिलांचे आर्थिक स्वातंत्र्य म्हणजे त्यांना उत्पन्न मिळवण्याचा स्त्रोत उपलब्ध असणे, त्या विविध कौशल्ये किंवा नोकरी याद्वारे उत्पन्न मिळवण्यास सक्षम असणे.आर्थिक स्वातंत्र्य म्हणजे व्यक्तीला त्याच्या पूर्ण क्षमतांचा वापर करून विविध कौशल्ये किंवा नोकरी याद्वारे अपेक्षित उत्पन्न मिळवणे आणि त्यांच्या आयुष्याला हवा तसा आकार देण्यास ते सक्षम असणे. त्यांचे आर्थिक जीवन त्यांना स्वतःच्या इच्छा आणि ध्येयानुसार निर्णय घेता येणे. त्याचबरोबर वित्तीय व्यवस्थापन करणे, विविध आर्थिक व्यवहार हाताळण्यास सक्षम होणे म्हणजे आर्थिक स्वातंत्र्य.

आर्थिक स्वातंत्र्य आणि कुटुंब संवर्धन यातील परस्परसंबंध

**आर्थिक स्वातंतत्र्यामुळे कुटुंबाच्या गरजा पूर्ण**

बदलत्या जीवनशैलीबरोबर मानवाच्या गरजाही बदलत आहेत . मानवी गरजा या वाढतच आहेत, या वाढत्या गरजा मानवी जीवनावर ओझं बनत चालल्या आहेत. या वाढत्या गरजा वैयक्तिक आणि सामाजिक दोन्ही स्तरावर अस्वस्थ करत आहेत. महिला आर्थिकरीत्या स्वयंपूर्ण बनल्या तर त्याच्या उत्पन्नामुळे कुटुंबाला आर्थिक स्थैर्य प्राप्त होते. घरखर्च, मुलांचे शिक्षण, आरोग्य यासारखे खर्च योग्यरीत्या हाताळता येऊ शकतात. यामुळे कुटुंबाचा आर्थिक जीवनस्तर उंचावतो. कुटुंबावरील आर्थिक ताण कमी होतो.

कुटुंबाचे आर्थिक गरजा भागवता होणारी ओढाताण कमी होते. विशेषतः मध्यम वर्गीय व निम्न मध्यमवर्गीय उत्पन्न गटातील कुटुंबातील महिला या आर्थिकरित्या स्वयंपूर्ण बनल्या तर त्यांच्या कुटुंबाच्या आर्थिक गरजा उत्तमरित्या भागवल्या जातात व त्यांच्या राहणीमान दर्जा सुधारण्यास मदत होते. आर्थिक अडचणीच्या काळात त्या आधार म्हणून उभ्या राहू शकतात तसेच मुलांना चांगल्या शिक्षण आणि आरोग्याच्या सुविधा पुरवण्यास सक्षम बनतात.

**निर्णयसत्तेतील स्थान**

निर्णय घेणे म्हणजे समस्या समजून घेणे, त्यावरील उपाय शोधण्यासाठी उद्दिष्ट निश्चित करणे, पर्यायी मार्ग शोधणे, त्यासाठी आपल्याल्या योग्य वाटेल असा मार्ग निश्चित करणे तो मार्गावर कार्य करणे. या निर्णय घेण्याच्या प्रक्रियेवर वैयक्तिक आणि सामाजिक गोष्टींचा प्रभाव असतो.

महिलांच्या निर्णय घेण्याच्या क्षमतेवर शिक्षण आणि आर्थिक स्वातंत्र्य या दोन गोष्टींचा महत्त्वपूर्ण प्रभाव दिसून येतो. ज्या महिला आर्थिकरित्या स्वयंपूर्ण असतात त्या कुटुंबाच्या निर्णय घेण्याच्या प्रक्रियेत अधिक प्रभावीपणे सहभागी असतात. महिलांचे वैयक्तिक आर्थिक उत्पन्न आणि निर्णय घेणे यात सरळ प्रमाणशीर संबंध आहे. जसजसे वैयक्तिक उत्पन्न वाढत जाते तसतसे निर्णय घेण्यातील सहभाग वाढत जातो व जसजसे वैयक्तिक उत्पन्न कमी होत जाते तसतसे निर्णय घेण्यातील सहभाग कमी होत जातो.

घर, जमीन अशी महत्वाची खरेदी, कर्जे, बचती आणि गुंतवणूक अशा महत्वाच्या आर्थिक बाबींविषयी आर्थिक स्वयंपूर्ण महिला निर्णय घेण्यास अधिक सक्षम दिसून येतात. कुटुंब नियोजन, मुलांचे उच्च शिक्षण याबातीत त्यांच्या निर्णयाला अधिक स्थान प्राप्त होते.

**सामाजिक आणि मानसिक स्थैर्य**

मानवाच्या मुलभूत गरजा पूर्ण झाल्या की तो मानसिकरित्या आनंदी होतो व मानसिक स्थैर्य प्राप्त करतो. महिला ज्यावेळी आर्थिकरित्या स्वतंत्र झाल्या कि कुटुंबाच्या आर्थिक गरजा अधिक चांगल्या रीतीने पार पाडल्या जातात, कुटुंबाचा राहणीमान दर्जा उंचावतो. त्यामुळे कुटुंबाला मानसिक स्थैर्य प्राप्त होते व कुटुंबातील लोक अधिक आनंदी जीवन जगतात. समाजाचे स्थैर्य हे व्यक्ती आणि कुटुंब संस्थेवर अवलंबून असते. समाजचेही उत्पन्न वाढते व समाजही स्थैर्य प्राप्त करतो.

महिलांच्या आर्थिक स्वातंत्र्यामुळे लिंगभेद कमी होतो. समाजातील विषमता कमी होते. स्त्री आणि पुरुष असा वाद निर्माण न होता दोन्ही समान स्तरावर येतात. समाजाला आर्थिक आणि समाजिक स्तरावर स्थिरता प्राप्त होते. महिलांचे कुटंब आणि समाजातील स्थान अधिक बळकट होते.

महिलांच्या आर्थिक स्वातंत्र्यासामोरील अडचणी

शिक्षण आणि कौशल्याचा अभाव

शिक्षण हे महिलांच्या आर्थिक स्वातंत्र्य मिळवण्याच्या मार्गातील महत्त्वाचा भाग आहे. पण महिलांना शिक्षणाची संधी कमी मिळते. शालेय शिक्षण ते उच्च शिक्षणापर्यंत त्यांच्या गळतीचे प्रमाण जास्त असते. त्यामुळे त्या योग्य व पुरेसे शिक्षण घेऊ शकत नाहीत. शिक्षणाचा अभाव हा त्यांच्या आर्थिक स्वातंत्र्यसमोरील मोठा अडसर बनतो. शिक्षण कमी असल्यामुळे त्या चांगल्या नोकरी मिळवण्यास मुकतात. शिक्षणाबरोबरच उत्पन्न मिळवण्यास आवश्यक असणारे विविध व्यायसायिक कौशल्य सामाजिक अडथळे आणि कौटुंबिक जबाबदारी यामुळे त्यांना प्राप्त होत नाही. महिला अर्थार्जन करण्यात मागे पडतात.

असमान वेतन

महिलांच्या आर्थिक स्वातंत्र्यासमोरील अजून एक अडसर म्हणजे असमान वेतन. महिलांना समान कामासाठी पुरुषांपेक्षा कमी वेतन दिले जाते. पूर्वीपासून चालत आलेली वेतन प्रणाली, व्यवसायांची विभागणी, असमान संधी यामुळे आपल्याल्या हि असमानता दिसते. महिलांना जर आर्थिकरित्या सक्षम करून समाजाचा विकास करण्यासाठी हा अडसर दूर करणे गरजेचे आहे.

**लिंगभेद आणि कुटुंबाची जबाबदारी**

समाजाच्या पूर्वीपासून चालत आलेल्या चालीरीती आणि परंपरा यामुळे स्त्रियांना दुय्यम स्थान दिले जाते. त्यामुळे शिक्षण, रोजगार याबातीत त्यांना पुरेश्या संधी उपलब्ध होत नाहीत. त्यांना घरकाम, मुलांचे संगोपन अशा भूमिकेतच बांधून ठेवले जाते. त्यामुळे त्या शिक्षण आणि उत्पन्न यांच्या संधीला मिळवू शकत नाहीत. काम आणि कुटुंब जबाबदारी यामध्ये समतोल साधत असताना त्यांचे काम मागे राहते आणि त्यांच्या आर्थिक स्वातंत्र्य मिळवण्यात अपयशी ठरतात.

**सामाजिक दबाब**

महिलांना नोकरी किंवा व्यवसाय करताना कुटुंब आणि समाजाचा विरोध असतो. आजही आर्थिक बाबींबाबत निर्णय घेण्याबाबत अधिकार हे पुरुषांकडेच आहेत. तसेच लग्नसंस्था त्यामुळे त्यांचे होणारे स्थलांतर असे अनेक अडथळे त्यांच्या आर्थिक स्वातंत्र्य मिळवण्याबाबत येतात.

**कर्ज आणि भांडवलाची कमी उपलब्धता**

महिला व्यवसायकांना कर्ज आणि भांडवल उभे करण्यास मोठी आव्हाने येतात. त्यामुळे त्या स्पर्धेत टिकाव धरू शकत नाहीत. व्यवसाय सुरु करणे, ते टिकवणे त्यांना कठीण जाते. भांडवलाच्या अपुरेपणामुळे आर्थिक बाबींमध्ये योगदान देण्यास असमर्थ ठरतात. आर्थिक संस्था यांच्याकडून त्यांना पुरुषांबरोबरीची वागणूक मिळत नाही.

उपाययोजना

**शिक्षणाच्या संधीमध्ये वाढ करणे**

महिलांना शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून देणे. त्यांचे उच्च शिक्षणातील गळतीचे प्रमाण कमी करण्यास मदत करणे. महिलांना व्यावसायिक शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून देणे. सरकार व विविध सेवाभावी संस्था द्वारे त्यांना आवश्यक असे शिक्षण उपलब्ध व्हावे असे उपक्रम राबवले जावेत. त्यांच्या वेळेनुसार आणि वयाच्या कोणत्याही टप्यावर शिक्षण घेता येईल अशी शैक्षणिक प्रणाली राबवली गेले पाहिजे.

**लिंगभेद नष्ट करणे**

घर, कामाचे ठिकाण आणि समाज या सर्व ठिकाणी लिंगभेद कमी करण्यासाठी जागरूकता केली पाहिजे. त्यांना पुरुषांबरोबरचे स्थान मिळवून देणे. स्त्रियांना फक्त घर आणि मुलांचे संगोपन यापुरते मर्यादित न ठेवता त्यांचा विविध क्षेत्रात

सक्रीय सहभाग कसा वाढवता येईल यावर भर दिला पाहिजे. सरकार कडून समान कामासाठी समान वेतन मिळवून देण्यासाठी धोरण आखून त्याची अंमलबजावणी केली गेली जावी.

आर्थिक सहाय्य आणि वित्तीय समावेशन

महिला व्यवसायिकाना प्रोत्साहन देण्यासाठी सरकार आणि वित्तीय संस्था यांनी महिलांना कर्ज आणि निधी देण्याची प्रक्रिया सुलभ करणे, विशिष्ट उपक्रम राबवणे याद्वारे आर्थिकदृष्ट्या महिलांना सक्षम करू शकतात. लघु उद्योग सुरु करण्यासाठी कर्ज देणाऱ्या संस्था यांची पोहच अधिक महिलांपर्यंत करणे, ग्रामीण भागातील महिलांसाठी विशेष योजना राबविणे. बँकिंग सेवा वाढवून वित्तीय समावेशन करणे.

**सामाजिक जागरुकता**

कुटुंबाने महिलांच्या काम करण्यासाठी त्यांना पाठिंबा देणं महत्त्वाचं आहे. कुटुंबाच्या सदस्यांना, विशेषतः पुरुषांना, महिलांच्या कामाचे महत्त्व आणि त्यांच्या स्वावलंबनाची गरज समजावून सांगणे आवश्यक आहे. कुटुंबातील सदस्यांमध्ये समान जबाबदारीचे विभाजन करणे, म्हणजेच घरकाम आणि मुलांचे पालन यामध्ये पुरुषांचा भाग वाढवावा.

**निष्कर्ष**

कुटुंब व्यवस्थितीरित्या चालण्यासाठी पुरुष आणि स्त्री या दोघांकडे समान अधिकार आणि समान दर्जा असणे गरजेचे आहे. महिला आर्थिकरित्या स्वतंत्र असणे गरजेचे म्हणजे निर्णय घेण्यास त्या अधिक सक्षम होतात. कुटुंब संगोपन करणे, मुलांना अधिक सोयीसुविधा पुरविणे आणि मानसिक आणि सामाजिक स्थैर्य मिळवणे यामध्ये त्या महत्वाची भूमिका बजावतात. महिलांच्या आर्थिक स्वातंत्र्यामुळे कुटुंब आणि समाजाचा स्तर उंचावण्यास मदत होते.

हे आर्थिक स्वातंत्र्य मिळवताना महिलांना सामाजिक दबाव, लिंगभेद, शिक्षणाच्या कमी संधी अशे अडथळे पार करावे लागतात. लिंगभेद आणि वेतन तफावत प्रभावीपणे दूर करण्यासाठी, समाजाने समान कामासाठी समान वेतनाला प्रोत्साहन देणारी धोरणे अंमलात आणली पाहिजेत. व्यवसायांना पारदर्शक भरपाई पद्धती स्वीकारण्यास प्रोत्साहित केले पाहिजे.

विशेषतः महिलांसाठी आर्थिक साक्षरता कार्यक्रम वाढवणे त्यांना , बचत आणि त्यांचे पैसे गुंतवण्याबाबत माहितीपूर्ण निर्णय घेण्यास सक्षम बनवू शकते. शिवाय, कर्ज आणि गुंतवणूकीच्या संधींमध्ये प्रवेश वाढवणे यासाठी सरकार आणि सामाजिक स्तरावर प्रयत्न करणे. तसेच त्यांचा व्यवसाय सुरू करू किंवा वाढवू इच्छिणाऱ्या महिला उद्योजकांना पाठिंबा देणे, ज्यामुळे त्यांच्या आर्थिक स्वातंत्र्यात योगदान देणे. महिलांसाठी शाश्वत आर्थिक स्वातंत्र्य प्रत्यक्षात येण्यासाठी, सध्या अस्तित्वात असलेले आर्थिक अडथळे दूर करण्यासाठी सरकार, संघटना आणि समुदायांकडून एकत्रित प्रयत्न केले पाहिजेत. एकत्र काम करून, आपण असे वातावरण तयार करू शकतो जिथे महिला केवळ त्यांच्या आर्थिकरित्या स्वतंत्र होणार नाहीत तर त्या आत्मनिर्भर व्यक्ती म्हणून वावरू शकतील असा आपण त्यांच्यासाठी समतापूर्ण समाज निर्माण करून करू.

**संदर्भ सूची**

1. Patel, R. & Patel N. (2020), Impact of Microfinance on Women Empowerment: A Study from the Decision - Making Perspective. Indian Journal of Finance. PP. 52 to 68.
2. Mohapatra, S., & Sahoo, B. K. (2016). Determinants of participation in self – help -groups (SHG) and its impact on women empowerment. Indian Growth and Development Review, Volume 9 Issue (1), PP 53 – 78. https://doi.org/10.1108/IGDR-04-2015-0016
3. Pandey, S., (2024). A Critical Examination of Women's Economic Independence. Shodh Sagar International Journal for Research Publication and Seminar, Vol.15 Issue 2, PP 19-23
4. Sundari R (2023). Changing Dynamics of Women Role in Family Structure. International Journal of Research Publication and Reviews, Vol 4, No.9, pp 2585-2587
5. Kushwah A, (2015) Women's Economic Independence and Change in Family Structures, Research Reinforcement, Vol. I, pp 83-88
6. Bala, M. and Monga, O.P. (2004). Impact of women's employment on decision making in families. Social Welfare, 51(5): 13-16.

7. Devi, M.S. and Rayalu, T.R. (2003). Perception of working and non-working women on their relative empowerment in self decisions in urban families. Indian Psychological Review, 60(1): 10-16.
8. Gupta, M. (2003). A Walk Down Memory Lane. An Insiders Reflection in the Campaign against Sex Selective Abortions. Unpublished News Letter, Museum Pune.
9. Singh, V. (2000). Human resource management and organizational effectiveness. Manage Extension Research Review (January-June), 1(1): 48-50.